## <u>नि.क्र. ६३ वरील आदेश</u>

( दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मा. मुख्याधिकारी नगरपरिषद माजलगाव यांना मिळकत क्र.२१/१२९ सर्व्हे नं. ३८७ या मिळकतीच्या संदर्भातील बांधकाम परवाना, वादीचा अर्ज, दुसरा बांधकाम परवाना व बांधकाम नकाशा इत्यादी कागदपत्रांच्या मुळ संचिकेसह साक्षीकामी साक्षसमन्स काढावे यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, त्यांनी सदर प्रकरणात बांधकाम परवाना, वादीचा अर्ज, दुसरा बांधकाम परवाना व बांधकाम नकाशा इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. सदर कागदपत्रे नगरपरिषद माजलगाव यांचे संदर्भातील व त्यांनी निर्गमित केलेली आहेत. सदर कागदपत्रांच्या संदर्भाने साक्षीपुरावा होवुन नमुद कागदपत्रांना निशाणी क्रमांक देणे आवश्यक आहे. तसेच सदर कागदपत्रे तपासणीकामी व त्याला निशाणी देवुन ती कागदपत्रे सिध्द करण्यासाठी मा.मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगाव यांना साक्षीसमन्स काढणे आवश्यक आहे असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावरच प्रतिवादी यांनी त्याचे म्हणणे देवुन आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदर अर्ज दाव्याची सुनावणी लांबविण्याकरीता दिलेला आहे. वादीने अदयापी त्याला स्वत:ला तपासले नाही. वादीने स्वत:ला न तपासता न्यायालयाच्या परवानगीशिवाय दुसरे साक्षीदार तपासता येणार नाहीत असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १३ नियम १० मध्ये न्यायालयाला स्वत:च्या अभिलेखातुन किंवा अन्य न्यायालयाकडुन कागदपत्रे मागवता येतील अशी तरतुद आहे ती खालीलप्रमाणे :-

दि.प्र.सं. क्रम १३ नियम १० -

(१) न्यायालयास स्वत:होवुन आणि दाव्यांमधील कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून स्वविवेकानुसार स्वत:च्या अभिलेखातुन किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाकडुन अन्य कोणत्याही दाव्याचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागविता येईल व त्याची तपासणी करता येईल.

(२) या नियमाखाली केलेल्या प्रत्येक अर्जासोबत (न्यायालयाने अन्यथा निर्देश दिलेला नसेल तर) त्याच्या पुष्टयर्थ एक शपथपत्र सादर केले पाहिजे व ज्या दाव्यामध्ये अर्ज करण्यात आला असेल त्या दाव्याच्या संबंधात तो अभिलेख कशा प्रकारे महत्वाचा आहे

ते आणि अर्जदारास हवी असलेली रितसर अधिप्रमाणित केलेली अभिलेखाची किंवा त्याच्या भागाची प्रत गैरवाजवी विलंब किंवा खर्च केल्याशिवाय मिळविणे शक्य नाही, किंवा न्यायाच्या प्रयोजनार्थ मुळ प्रत हजर करणे आवश्यक आहे असे दाखवुन दिले पाहिजे.

(३) पुराव्याच्या कायदयानुसार दाव्यामध्ये जो अग्राहय ठरू शकेल असा कोणताही दस्तऐवज पुराव्यामध्ये वापरण्यास, न्यायालयाला या नियमांत अंतर्भुत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे शक्य होते असे मानण्यात येणार नाही.

५. दि.प्र.सं.क्रम १३ नियम १० उपनियम २ मधील तरतुदीनुसार अर्जाच्या पुष्टयर्थ शपथपत्र असणे आवश्यक आहे.तसेच सदर अभिलेख कशाप्रकारे महत्वाचा आहे, त्याची रीतसर अधिप्रमाणित अभिलेखाची प्रत किंवा त्याच्या भागाची प्रत गैरवाजवी विलंब किंवा खर्च केल्याशिवाय मिळविणे शक्य नाही किंवा न्यायाच्या प्रयोजनार्थ मुळप्रत हजर करणे आवश्यक आहे या बाबी वादीने दाखविणे गरजेचे आहे.

६. वादीने सदर अर्जाच्या पुष्टयर्थ शपथपत्र सादर केले नाही.वादीने सदरचा दावा प्रतिवादीने हरकत, अडथळा करू नये म्हणुन निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. दाव्यात काढलेल्या मुद्यांनुसार त्याने सामाईक जागेच्या पुर्वेकडील भागास वॉल कंपाउंडचे कायदेशीर बांधकाम केले आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर ठेवण्यात आली आहे. सदर मुद्यांच्या अनुषंगाने प्रथमतः वादीच्या स्वतःकडे जो पुरावा असेल तो पुरावा त्याने स्वतःला तपासुन स्वतःकडील पुरावा सादर करणे आवश्यक आहे. वादीने त्यास आवश्यक असलेली कागदपत्रे कशाप्रकारे महत्वाची आहेत, त्यास हवी असलेली सदर कागदपत्रे रितसर अधिप्रमाणित केलेली अभिलेखाची किंवा त्याच्या भागाची प्रत गैरवाजवी विलंब किंवा खर्च केल्याशिवाय मिळविणे शक्य नाही, किंवा न्यायाच्या प्रयोजनार्थ सदर संचिकेची मुळप्रत हजर करणे आवश्यक आहे या बाबी स्पष्ट केलेल्या नाहीत. दि.प्र.सं. आदेश १३ नियम १०(२) मधील तरतुदी व आवश्यक बाबींचा विचार करता अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

सही /—

( र.आ.सावंत )

दि.३१.०१.२०२४

सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
माजलगाव.

नि.दि.दा.क्र.१३१/२०१६
कचरूलाल -वि- धनंजय
**CNRNO.-MHBI800-0254-2016**

## <u>नि.क्र. ६४ वरील आदेश</u>

( दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा काढुन टाकण्याच्या आदेशासाठी ठेवण्यात यावा हा आदेश रद्द करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, सदर दावा काढुन टाकण्याच्या आदेशासाठी ठेवण्यात आला होता. तथापि, त्यानंतर वादीने साक्षसमन्स काढण्यासाठी अर्ज केला. त्यानंतर दावा सदर अर्जाच्या चौकशीसाठी लावण्यात आला असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावरच प्रतिवादी यांनी त्याचे म्हणणे देवुन आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा काढुन टाकण्याच्या आदेशासाठी ठेवण्यात आल्यानंतर वादींनी दखल घेतली नाही.वादीने स्वत:ला न तपासता साक्षीसमन्स काढण्याचा अर्ज दिला. दाव्यास विलंब व्हावा म्हणुन वादीने अर्ज दाखल केला आहे असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर दाव्यात दि. ०४. ०२.२०२२ रोजी दावा काढुन टाकण्याच्या आदेशासाठी ठेवण्यात आला. त्यानंतर वादीने दि. २६.०४.२०२२ रोजी नि. ६३ येथे साक्षसमन्स काढण्यासाठी अर्ज दिला आहे. त्यानंतर त्या अर्जाच्या अनुषंगाने दाव्यातील कारवाई पुढे गेली. वादी सदर अर्जान्वये 'दावा काढुन टाकण्याच्या आदेशासाठी ठेवण्यात आला' हा आदेश रद्द करू इच्छित आहे. सदर आदेश रद्द केल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार नाही. सबब, वरील कारणांचा विचार करुन न्यायाचे उद्घिष्ट साध्य करण्यासाठी खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. नि.क्र. ०१ वर झालेला दि. ०४.०२.२०२२ रोजीचा 'दावा काढुन टाकण्याच्या आदेशासाठी ठेवण्यात आला' हा आदेश रद्द करण्यात येतो.

सही /—

( र.आ.सावंत )
सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
माजलगाव.

दि.३१.०१.२०२४